# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक १२/०५/२०१७

## *पोलीस-नक्षल चकमकीत नक्षल साहित्य जप्त*

- *नक्षल साहीत्यातील भुसुरुंग जागेवरच निकामी*

दिनांक ०९/०५/२०१७ रोजी उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या पोमके कोटमी हद्दीत विशेष अभियान पथक नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना इरुपगुट्टा जंगल परीसरात पोलीस-नक्षल चकमक झाली. पोलीसांनी आत्मसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार केला. पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी आपल्या जवळील साहित्य घटनास्थळीच टाकून जंगलाचा फायदा घेवून पळून गेले.

दरम्यान चकमकीनंतर घटनास्थळाचा शोध घेतला असता पोलीसांनी घटनास्थळावरुन ३ क्लेमोर माईन, पिट्टू, दररोज वापराचे साहीत्य, तसेच लिखीत साहीत्य असे नक्षल साहीत्य जप्त केले आहे. त्यानंतर मिळालेले क्लेमोर माईन बॉम्ब शोधक व नाशक पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर जागेवरच निकामी केले.

नक्षलवादयांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.



# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांक:- १२/०५/२०१७

## *<u>मा. पोलीस महासंचालकांनी केला भामरागड येथील घटनास्थळाचा दौरा</u>*

राज्याचे मा. पोलीस महासंचालक श्री. सतीश माथूर सा़ो. यांनी काल दिनांक ११/०५/२०१७ रोजी, भामरागड येथील हेमलकसा ते कारमपल्ली रोड येथे दिनांक ०३/०५/२०१७ रोजी झालेल्या भुसुरूंग स्फोटातील घटनास्थळाची पाहणी केली. त्याचबरोबर त्या दिवशी घडलेल्या घटनांचा सविस्तर आढावाही घेतला. तसेच जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या नक्षलविरोधी अभियानाचाही आढावा घेतला. व नक्षल्यांविरूध्द राबविण्यात येणाऱ्या रणनीतीमध्ये आणखी काय सुधारणा करता येतील याबाबत उपस्थित वरीष्ठ अधिकारी यांना मार्गदर्शन केले. सोबतच दिनांक ०३/०५/२०१७ रोजी भुसुरूंग हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या पोशि/५२१० सुरेश लिंगा तेलामी यांच्या कुटूंबियांची भेट घेवून त्यांचे सांत्वन केले व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच शहिद वीर पत्नी झिनत तेलामी यांना तीन लाख रूपयांची आर्थीक मदत केली. याचबरोबर सरांनी पोस्टे भामरागड येथेही भेट दिली. यावेळी मा. पोलीस उपमहानिरीक्षक, रा.रा.पो.ब. श्री. संदिप कर्णिक, मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख, मा. अपर पोलीस अधिक्षक (अभियान) डॉ. महेश्वर रेड्डी, मा. अपर पोलीस अधिक्षक अहेरी श्री. ए. राजा हे उपस्थित होते.





